# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१, अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१

ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.org.in


जा. क्र. एमसीआयएम/२२०६८०/२०२२ दि. - 9 JUN 2022

## जाहीर सूचना

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई या परिषदेमध्ये **दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१७** पर्यंत नोंदणीकृत असलेल्या वैद्यकीय व्यवसायींनी आपल्या नोंदणीचे नूतनीकरण www.mcimindia.in (MCIM Tatpar) या संकेतस्थळावर नूतनीकरणाचा अर्ज व शासनाद्वारे प्रकाशित राजपत्रानुसार निर्धारित केलेले शुल्क रु. २,०००/— भरुन **दि. १३.०६.२०२२ पासून ९० दिवसांच्या** आत करावे. सदरील प्रक्रियेद्वारे नूतनीकरणासाठीचा अर्ज सादर करतांना छायाचित्र (पासपोर्ट साईज फोटो), स्वाक्षरी, नोंदणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे विनिर्दिष्ट पद्धतीने अपलोड करावयाची आहेत.

जर उक्त निर्धारित कालमर्यादेपेक्षा नूतनीकरणाचा अर्ज व शुल्क भरण्यास अधिक विलंब झाल्यास महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ सुधारणा २०१८ मधील तरतुदींनुसार रु. ३,५००/— अधिक रु. १०० प्रति महिना यानुसार विलंब शुल्क आकारण्यात येईल याची सुद्धा सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी **दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१७** पर्यंत नोंदणीकृत असलेल्या वैद्यकीय व्यवसायींनी आपल्या नोंदणीचे नूतनीकरण सदर प्रक्रियेद्वारे तात्काळ करुन घ्यावे. तसेच दि. ३१.१२.२०१५ पूर्वी नोंदणीकृत असलेल्या वैद्यकीय व्यवसायींची नोंदणी नूतनीकरण प्रक्रिया या अगोदरपासून www.mcimindia.in (MCIM Tatpar) या संकेतस्थळावर सुरु आहे याची सुद्धा नोंद घ्यावी.

आपला

(डॉ. डी. यु. वांगे)
प्रबंधक